SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : (www.unishivaji.ac.in)
Direct : 0091-0213-2693176 FAX : 0091-0231-2690655
E-mail : coe@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– परीक्षक नियुक्ती विभाग 2609491, 2609102, 2609103

A
Re-accredited by NAAC
(2014) With CGPA-3.16

*Ref. No.:-* शिवाजी वि./परीक्षकनियुक्ती/५७४६ दि. ०५/०३/२०१५

प्रति,
प्राचार्य/संचालक/अधिविभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

विषय :– मार्च/एप्रिल, 2015 मध्ये होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखेबाबत.

संदर्भ :– 1.इकडील जा. संदर्भ क. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/5092 (परिपत्रक क.19)दि. 28 जानेवारी, 2015

महोदय/महोदया,

वरील विषय संदर्भाबाबत आपणास आदेशानुसार कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल, 2015 मध्ये होणाऱ्या उन्हाळी परीक्षांचे परीक्षा अर्ज भरण्याची मुदत वरील संदर्भ परीपत्रकानुसार दि. 28.02.2015 रोजी संपली आहे. परीक्षा अर्ज भरण्याची मुदत संपल्यामुळे एम.के.सी.एल व संगणक विभागाने सर्व्हर बंद केले आहे. परंतू माहे नोव्हेंबर/डिसेंबर, 2014 मधील कांही पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे अद्याप परीक्षांचे निकाल जाहीर झाले नसल्याने व ज्या परीक्षांचे निकाल जाहिर झाले आहेत परंतू त्या परीक्षांचे अर्ज काही तांत्रिक कारणामुळे जनरेट होत नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/5587 दि. 24.02.2015 अन्वये विनाविलंब शुल्काने महाविद्यालयातच Online भरावेत. तसेच ज्या अभ्यासक्रमाचे निकाल वेळेत जाहीर होऊनही ज्यांनी अद्याप परीक्षा अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी अति विलंब शुल्काने परीक्षा अर्ज महाविद्यालयातच Online भरावेत व महाविद्यालयांनी त्याच दिवशी Online Inward करावेत.

यासाठी **<u>शुकवार दि. 13.03.2015 रोजी सकाळी 8.00 पासून रात्री 12.00</u>** पर्यत सर्व्हर सुरू ठेवण्यात येणार असून सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज संगणक व एम.के.सी.एल या पोर्टलवर भरावेत. तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये भरलेल्या परीक्षा अर्जाची यादी विद्यापीठामध्ये दि. 16.03.2015 रोजी जमा कराव्यात.

तसेच Online.shivajiuniversity.in/Appointment Portal मध्ये महाविद्यालयातील नियमित शिक्षकांची माहिती ज्या महाविद्यालयांनी अद्यापी भरलेली नाही किंवा अपुर्ण भरलेली आहे. अशा महाविद्यालयांनी Online महिती भरून सदर माहितीची हार्ड कॉपी प्राचार्यांच्या Covering letter सहित परीक्षा अर्ज यादी परीक्षा विभागात सादर करताना सोबत जोडावी अन्यथा परीक्षा अर्ज यादी स्वीकारली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

महेश काकडे
परीक्षा नियंत्रक

प्रत: 1. संगणक विभाग
2. एम.के.सी.एल.
3. लेखा (कॅश) विभागास
4. सर्व ऑन परीक्षा विभागास